# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## कर आकारणी विभाग

## जाहीर नोटीस

नाशिक महानगरपालिका, नाशिक क्षेत्रातील नागरीकांना कळविण्यात येते की, मालमत्ता कराचे सन २०२०-२०२१ चे देयके जनरेट करुन पाहण्याकरीता व प्राप्त करण्याकरीता महानगरपालिकेच्या nmctax.in व nmc.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आलेली असुन, याबाबत आपणास एसएमएसद्वारे सूचित करण्यात आले आहे.

तथापी सन २०२०-२०२१ चे मालमत्ता कराची देयके, कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव वाढल्यास मिळकती मध्ये समक्ष देणे शक्य न झाल्यास, nmctax.in व nmc.gov.in या संकेतस्थळांवरुन देयके प्राप्त करुन घ्यावीत.

अ) जे मिळकतधारक/ भोगवटादार चालु सरकारी वर्षाकरीता, थकबाकीसह चालु मागणीतील दोन्ही सहामाहीचा संपुर्ण एकरकमी भरणा करतील, त्यांना खालील कालावधी करीता सुट देण्यात येत आहे.

- चालु आर्थिक वर्षाचे मनपा करांवर **माहे एप्रिल ते जुन - ५ टक्के**
- चालु आर्थिक वर्षाचे मनपा करांवर **माहे जुलै - ३ टक्के**
- चालु आर्थिक वर्षाचे मनपा करांवर **माहे ऑगष्ट - २ टक्के**

ब) ई- पेमेंटद्वारे (Online) भरणा करणाऱ्या नागरिकांना, उक्त सवलती व्यतिरिक्त मालमत्ता कराचा एकरकमी भरणा करणाऱ्यांकरीता, मनपाकरांवर **१ टक्का सुट** कमाल र.रु १०००/- पर्यंत देण्यात येत आहे.

ज्या नागरीकांकडे ऑनलाईन सुविधा उपलब्ध नाही अशा नागरिकांकरीता सर्व नागरीक सुविधा केंद्रे कार्यालयीन दिवशी सुरु असून आपण रोख/धनादेशाद्वारे मालमत्ता कर व पाणीपट्टी बिलाची रक्कम जमा करु शकतात.

मालमत्ता कर व पाणीपट्टी विहित वेळेत जमा करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**घरी रहा, सुरक्षित रहा व शक्यतो ऑनलाईन पेमेंट करा.**

| | |
|---|---|
| स्वाक्षरी/- | स्वाक्षरी/- |
| उपआयुक्त (कर) | आयुक्त |
| नाशिक महानगरपालिका, नाशिक | नाशिक महानगरपालिका, नाशिक |

जा.क्र./जनसंपर्क/वशि/१४२/२०२० दि. २६/०६ /२०२०

---

वाचा : १. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र५९/नवि-२०, मंत्रालय मुंबई, दि. ०५ एप्रिल २०१६.

२. महाराष्ट्र शासन शुध्दीपत्रक, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र५९ /नवि-२०, मंत्रालय मुंबई, दि. ०७ एप्रिल २०१६.

३. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र५९/नवि-२०, मंत्रालय मुंबई, दि. ०९ जानेवारी २०१७.

४. महापालिका ठराव क्र. २६८ दि. २०/०७/२०१७.

५. आदेश जा.क्र/म.का/मुनिकसं/कक्ष-१/६३/२०१७ दि. २१/०८/२०१७.

६. महापालिका ठराव क्र. २१ दि. २९/०५/२०२०.

नाशिक महानगरपालिका, नाशिक
कर निर्धारण विभाग
जा.क्र.म.का/कर/कक्ष-१/१३९ /२०२०
दिनांक : २५ / ०६ / २०२०

**आदेश क्रमांक :- १०४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार, कर आकारणी व संकलन विभागामार्फत शहरातील इमारती व जमिनीवर मालमत्ता कराचे कर निर्धारण करणेत येऊन, करयोग्य मुल्य निश्चित केल्यानंतर मिळकतधारकास मागणीचे देयक बजाविणेत येते.

संदर्भिय शासन निर्णय क्र. १ ते ३ अन्वये जीवाची पर्वा न करता नि:स्वार्थीपणे देशाचे संरक्षण करतांना बजाविण्यात आलेल्या उत्कृष्ट कामगिरिकरीता संरक्षण दलातील शौर्य पदक धारकांना आणि माजी सैनिकांच्या विधवांना व जे सैनिक अविवाहित आहेत व ते देशाचे संरक्षण करतांना शहिद झाले अशा अविवाहित शहिद झालेल्या सैनिकांच्या नामनिर्देशित मालमत्तांना, मालमत्ता करात संदर्भ क्र. ४ च्या महापालिका ठरावानुसार व संदर्भ क्र. ५ चे आदेशान्वये, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निवासी मिळकतींना माहे एप्रिल २०१७ पासुन मनपाच्या अटी-शर्तीनुसार सर्वसाधारण करात सुट देण्यात येत आहे.

मालेगांव महानगरपालिकेने मा. शासनाचे मार्गदर्शन मागवीले असता, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचे दि. १० मे २०१६ चे पत्रान्वये आजी/माजी सैनिक व सैनिक विधवा यांना मालमत्ता करात ५० टक्के सुट देण्याबाबत महानगरपालिकेने उचित निर्णय घ्यावा असे कळविले आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने माजी सैनिक व स्वातंत्र सैनिक यांना महापालिकेच्या मान्यतेने सर्वसाधारण करात ५० टक्के सुट दिली आहे. पुणे महानगरपालिकेने स्वातंत्र सैनिकांना महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पीएमसी/३००८/१६८/प्र.क्र.७८/०८/नवि-२२, दि. ९/४/२००९ अन्वये सर्वसाधारण करात सवलत दिलेली आहे.

त्यानुसार संदर्भ क्र. ५ च्या आदेशात नमुद सवलती व्यतिरिक्त, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील माजी सैनिक व स्वातंत्र सैनिक यांनी केलेल्या देशसेवेचा यथोचित सन्मान करणेसाठी, महानगपालिका स्तरावर त्यांचे राहत्या निवासी घरांना करात सवलत देणेबाबत विचाराधीन होते.

महापालिका ठराव क्रमांक २१ दिनांक २९.५.२०२० अन्वये माजी सैनिक व स्वातंत्र सैनिक यांचे निवासी मिळकतीस सामान्य करात सुट/सवलत देणे बाबत धोरण शासनाच्या मान्यतेस अधिनराहुन निश्चित करणेत येत आहे. त्याअनुषंगाने माजी सैनिक व स्वातंत्र सैनिक यांचे स्व: मालकीच्या एका राहत्या निवासी मिळकतींना सामान्यकरात ५०% सुट/सवलत खालील अटी-शर्तीनुसार देण्यात येत आहे.

१. नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिक व शासनाचे सन्मानपत्र असलेल्या किंवा जिल्हाधिकारी यांनी प्रमाणपत्र दिलेल्या स्वातंत्र सैनिक यांचे स्व: मालकीच्या फक्त एका रहात्या निवासी मिळकतीस चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील मालमत्ता करातील सर्वसामान्य करात सुट/सवलत देण्यात येत आहे.

२. सदर सामान्य करातील सुट/सवलतीचा लाभ माजी सैनिक व स्वातंत्रसैनिक किंवा त्यांची पत्नी हयात असेपर्यंत व हयात नसल्यास त्यांची अज्ञान मुले असल्यास त्यांचे या अज्ञान मुलांपैकी एक मुलगा सज्ञान होईपर्यंत अनुदेय राहील.